**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव - सिध्देश गुरुदास चिपकर
वय - ३३ वर्षे
व्यवसाय - पोलीस कॉन्स्टेबल ६०८
रा/ने - मालवण पोलीस ठाणे

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोगक्ता श्रीमती यु.आर.जाधव यांचेमार्फत शपथेवर सरू</u>**

१. दि. २६/१२/२०२४ रोजी माझी नेमणूक मालवण पोलीस स्टेशन अंतर्गत कट्टा दुरक्षेत्र येथे होती. सदर दिवशी विश्वसनिय बातमी मिळाली की, गाव मौजे गुरामवाड येथे एक इसम लोकांकडून पैसे स्वीकारुन जुगार खेळ खेळवत आहे. सदरची माहिती आम्ही पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी श्री.कोल्हे यांना सांगितली. त्यांनी सदर ठिकाणी आम्हाला छापा टाकण्यास सांगितले. तयावरुन पोहेकॉ १३५ मोरे यांनी पंच गुरुप्रसाद बाळकृष्ण नाईक व संतोष गोविंद जामसंडेकर यांना बोलावून घेवून छाप्याची माहिती समजावून सांगितली. त्यानंतर आम्ही पोलीस व पंच असे खाजगी वाहनाने गुरामवाडी येथे गेलो. तेथे रविकांत परुळेकर यांचे दुकान गाळयासमोरील रस्त्याच्या डाव्या बाजूस पान टपारीच्या शेजारी एक इसम हातामधील कागदावर दुसऱ्या इसमाच्या सांगण्यावरुन काही तरी लिखाण करत असल्याचे दिसून आला. आम्हाला त्याचा संशय आल्याने आम्ही त्या ठिकाणी जात असताना लिखाण करत असलेल्या इसमा समोरील दुसरा इसम आमची चाहूल लागताच पळून गेला. घटनास्थळी जो इसम मिळून आला त्याच्या हातातील कागदाची पाहणी केली असता त्यावरती मुंबई मटका नावाचे आयताक्ती पुस्तक त्यावर कार्बनव्दारे आकडेमोड केलेली दिसत होती. सदर पुस्तकाच्या डाव्या बाजूला पीना मारलेल्या दिसत होत्या. मध्यभागी मुंबई असे लिहिलेले होते. तसेच निळया रंगाचे बॉलपेन, ५००/- रुपयाच्या तीन नोटा, २००/- रुपयाच्या दोन नोटा, ५०/- रुपयाच्या दोन नोटा, २०/- रुपयाच्या दोन नोटा, १०/- रुपयाच्या चार नोटा असे एकूण २०८०/- रुपये त्याच्या ताब्यात मिळून आले. म्हणून सदर इसमाचे नाव गाव विचारले असता याने त्याचे नाव योगेश सत्यवान पवार वय ३३ वर्षे रा. साळेल नांगरभाट ता. मालवण असे सांगितले. सदर

आरोपी याचे ताब्यात मिळून आलेल्या मुद्देमाल जप्त करुन त्यावर पंचाच्या सहयाचे लेबल लावून व समक्ष पोलीस हेड कॉन्स्टेबल यांची सही घेवून सदर मुद्देमाल ताब्यात घेतला. सदर आरोपीचे ताब्यात मुंबई मटका जुगाराचे साहित्य मिळून आले म्हणून मी महाराष्ट्र जुगार अधिनियम १२-अ प्रमाणे दि. २६/१२/२०२४ रोजी सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद दिलेली आहे. साक्षीदारास दि. २६/१२/२०२४ रोजीची फिर्याद दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.पी१/पीडब्ल्यू१** दिली आहे. मी आरोपीस दाखविल्यास ओळखू शकतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण.

**आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञ श्री.ए.एस.गावडे यांचेमार्फत**

२. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कार्यालयामध्ये स्टेशन डायरीमध्ये नोंद घेतली जाते. हे म्हणणे खरे आहे की, छापा टाकण्यासाठी किंवा तपासकामासाठी जाताना स्टेशन डायरीमध्ये नोंद केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या फिर्यादमध्ये विश्वसनिय बातमी किती वाजता मिळाली ते नमूद नाही. हे मला माहित नाही की, पंच गुरुप्रसाद नाईक व संतोष जामसंडेकर यांनी बऱ्याच पंचनाम्यावर सहया केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, संतोष जामसंडेकर हे तिरवडे गावचे पोलीस पाटील आहे. हे मला माहित नाही की, दुरक्षेत्रापासून पंच संतोश जामसंडेकर यांचे घर तीन ते चार किलोमिटरच्या अंतरावर आहे. हे म्हणणे आहे की, तिरवडे गाव हे कट्टा दुरक्षेत्राच्या कार्यक्षेत्रामध्ये येते. हे म्हणणे खरे आहे की, ज्या खाजगी वाहनाने आम्ही छाप्याकामी गेला त्या खाजगी वाहनाचा प्रकार, नंबर व मालकाचे नाव फिर्यादमध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, तसे नमूद करण्यास कोणतीही अडचण नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या फिर्यादमध्ये ज्या पान टपरीचा उल्लेख आहे त्याच्या मालकीबाबत काही खात्री केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, कुणकवळे वेझरे दवाखाना ते कट्टा दुरक्षेत्र हा रहदारीचा व लोकवस्तीचा भाग आहे. हे म्हणणे खरे आहे की, गुरामवाड तिठ्ठा ते मेस्त्री यांच्या घरापर्यंत लोकवस्तीचा भाग आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी ज्या इसमाच्या बोलण्यावरुन लिखाण करत होता त्याला पकडण्याचा आम्ही प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पळून गेलेल्या इमसाची आम्ही आजुबाजूला चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, गुरामवाड येथे स्थानिक व स्वतंत्र साक्षीदार सहज उपलब्ध झाले असते. हे म्हणणे खरे

नाही की, ज्या इसमाला आम्ही पकडले त्या इसमाच्या नावा गावाची खात्री करण्याकरीता आम्ही कोणतेही कागदपत्रे पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, खात्री केलेल्या कागदपत्रांचे वर्णन व नंबर फिर्यादमध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्हीआरोपीला जागीच पकडलेले नाही व त्याच्या ताब्यातून कोणताही मुद्देमाल जप्त केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा हा कार्यालयात तयार केला असून पंचाच्या सहया कार्यालयामध्ये घेतलेल्या आहेत. हे मला माहित नाही की, एखादया इसमाच्या ताब्यात रोख रक्कम सहज उपलब्ध असते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कोणताही गुन्हा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरुन काहीतरी कारवाई केली हे दाखविण्यासाठी आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

एम.के.फकीह

दि. २५-०२-२०२६

न्यायदंडाधिकारी वर्ग - १ मालवण.